# यात्रा रद्द करण्याची नियमावली

यात्रेची बुकींग कंपनीच्या कोणत्याही बुकींग कार्यालयात केली गेली असली तरी यात्रा पोस्टपाँड/कॅन्सल करावयाची असल्यास यासंदर्भात सर्व प्रकारची रिफंडची कार्यवाही नाशिक कॉर्पोरेट ऑफिसमधुनच केली जाते. त्यामुळे यात्रेकरुंना रिफंड मिळणेसाठी नाशिक येथेच लेखी कारवाई करावी लागेल. आपल्याकडील सर्वच कागदपत्रे नाशिक कॉर्पोरेट ऑफिसमध्ये पोहोचल्यानंतर रिफंडसाठी किमान 180 दिवसांचा कालावधी लागतो. यात्रेकरुंनी स्वत:हून कोणत्याही कारणास्तव यात्रा/सहल रद्द केल्यास त्याबाबतचा लेखी अर्ज नाशिक कॉर्पोरेट ऑफिसात मिळाल्यानंतर **<u>एसआरएच्या एकूण रकमेतून</u>** त्या टूरसाठी झालेला विमान, हॉटेल, रेल्वेसह इतर खर्च तसेच प्रतिसीट डॉक्युमेंट चार्जेस रु.50/–प्रतिसीट वजावट केल्यानंतर राहिलेल्या रकमेतून खालील नियमाप्रमाणे कॅन्सलेशन चार्जेस अशी तिन्ही रक्कम वजावट करून परतावा देण्यात येईल.

| बुकींग केलेली यात्रा रद्द करण्याचा दिवस | वजा रक्कम | परताव्याची रक्कम |
|---|---|---|
| 1) 31 वा त्यापेक्षा जास्त दिवस असल्यास | 35% | 65% |
| 2) 0 ते 30 दिवस अगोदर वा यात्रेच्या दरम्यान असल्यास | 100% | काहीच नाही. |

| यात्रा निघण्यापुर्वी यात्रा पोस्टपाँड करण्याचा दिवस | वजा रक्कम | किमान रक्कम |
|---|---|---|
| 1) 21 वा त्यापेक्षा जास्त दिवस असल्यास | 5% | 200/– |
| 2) 11 ते 20 दिवस दरम्यान असल्यास | 7.5% | 300/– |
| 3) 3 ते 10 दिवस दरम्यान असल्यास | 10% | 500/– |
| 4) 0 ते 2 दिवस दरम्यान असल्यास | 25% | 1000/– |

यात्रा पोस्टपाँड करावयाची असल्यास एसआरएच्या एकुण रकमेच्या किमान 35% रक्कम कंपनीकडे जमा असणे आवश्यक आहे.

**विदेश यात्रांसाठी कॅन्सलेशन चार्जेस परिस्थितीनुरुप व्हिसा, विमान तिकीट खर्च इ.झालेला खर्च वजा करुन रिफंडचा नियम व कालावधी उपरोक्त लिखीत प्रमाणेच राहील.**